नि.दि.दा. क्र. ८१/२०२२

अनिल व इतर वि. प्रकाशराव

CNR No.MHWS080011372022

## निशाणी क्र. ५ खाली आदेश

## (पारित दिनांक ३०.०८.२०२३)

मुळ वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त ताकदीचा आदेश मिळणेकरीता दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार, सदरचा दावा कायम मनाईहुकूम मिळणेबाबत असुन सदर प्रकरणात नि.क्र. ०५ खाली अंतरिम मनाई हुकूम मिळणेबाबतचा अर्ज दाखल आहे. वादी हा वादमिळकतीचा मालक व ताबेदार असून वादमिळकतीवर वादीने बांधलेल्या घराच्या पश्चिमेकडील दरवाज्यासमोरील सरकारी रस्त्यावर प्रतिवादीने टिनपत्रे टाकू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्याची विनंती केली.

**०२** याउलट प्रतिवादी नि.क्र. १४ नुसार त्याचा लेखी जवाब दावा व प्रतिदावा दाखल करुन नि.क्र. ०५ ला म्हणणे दाखल दाखल केले. तसेच नि.क्र.१५ नुसार वादीविरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज सुध्दा दाखल केला आहे. प्रतिवादीने वादीचे सर्व कथन नाकारुन वादीने कथन केल्याप्रमाणे कोणताही रस्ता अस्तित्वात नसल्याचे सांगून वादीच्या घराच्या पश्चिमेला वादीची उर्वरीत जागा किंवा सरकारी रस्ता नसून सदर जागा प्रतिवादीची असल्याने वादीविरुध्द सदर जागेमध्ये पाईपलाईन किंवा बांधकाम करु नये असा प्रतिबंधात्मक आदेश मागितला आहे. तसेच वाद मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादीची जागा असल्याने सदरचा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

**०३** दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. दोन्ही पक्षांच्या वकिलांचा युक्तीवाद, दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन खालील मुद्दे निष्कर्षाकरीता माझ्या समोर उपस्थित झाले. सदर मुद्यांच्या कारणासह निष्कर्ष मी खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याचा अर्ज प्रथमदर्शनी सिध्द करतो काय ? | ...नाही. |
| २. | पुराव्याचा समतोल कोणाच्या बाजुने आहे ? | ...सिध्द झाले नाही. |
| ३. | अर्ज मंजूर केल्यास कोणाचे नुकसान होईल ? | ...प्रतिवादीचे |
| ४. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०४ करिता-**

**०४** मुद्दे क्र. ०१ ते ०३ एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती

टाळण्याकरीता ते एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आले आहेत. प्रकरणात दावा आणि प्रतिदावा असल्याने दोन्ही पक्षांना त्यांच्या मूळ दाव्यातील स्थितीनुसार संबोधन्यात येते. वादीचे कथन थोडक्यात असे की, मौजे देउळगाव बंडा ता. रिसोड जि. वाशिम येथील ग्रामपंचायत वार्ड क्र. ०१ मिळकत क्र. २२५ जीची लांबी–रुंदी ४० फुट x ३८ फुट क्षेत्रफळ १५२० चौरस फुट ज्यावर वादीने पक्के मकान बांधले आहे जीच्या चतुःर्सिमा पुर्वेस–रस्ता, पश्चिमेस–खाली जागा, दक्षिणेस–किशोर देशमुख, उत्तरेस–सुनिल देशमुख असुन दर्शनी भाग पुर्वेस व पश्चिमेस आहे. (सदर जागेला यानंतर दाव्यातील मिळकत असे संबोधण्यात येते.)

<u>०५</u> वाद मिळकत ही वादीची वडीलोपार्जित मिळकत असुन ती वादीच्या वडीलांपासून सतत, निरंतर व शांततामय ताब्यात आहे. वादीने सदरहु जागेवर पक्के मकान बांधकाम केले असून मकानास पूर्व व पश्चिम दिशेकडून दरवाजे ठेवण्यात आलेले आहेत. वादी हा त्या दरवाज्यांचा वापर बाहेर जाण्यासाठी करीत आला आहे व करत आहे. सदरहु मकानाच्या पश्चिम दरवाज्याला लागून असलेल्या सरकारी रस्त्याच्या लगतच्या खुल्या जागेवर लोखंडी टिनपत्रे टाकुन प्रतिवादी हा सदर रस्त्यावर ताबा करण्याचा प्रयत्न करित आहे. सदर पश्चिमेकडील दरवाज्याचा वापर वादी हा पश्चिमेकडील रस्त्यावर येण्यासाठी करीत आहे.

<u>०६</u> दिनांक ०१.०६.२०२२ रोजी वादी त्याच्या पश्चिमेकडील दरवाज्यामध्ये उभा असतांना प्रतिवादी हा लोखंडी टिनपत्रे घेवून आला व तो वादीचे पश्चिमेकडील असलेल्या दरवाज्या समोरील म्हणजे सरकारी रस्ता व वादीचे घर यामध्ये असलेल्या सरकारी खुल्या जागेवर टाकणार होता. तेव्हा वादीने त्यास 'माझे वापरातील रस्त्यात तु टिनपत्रे टाकु नको' असे म्हटले असता, 'माझी जागा आहे, मी येथे टिनपत्रे टाकीन तुझेच्याने जे होते ते करुन घे' अशी धमकी दिली. वादीने गावातील सरपंच, पोलिस पाटील तथा इतर प्रतिष्ठीत लोकांकडे जाउन प्रतिवादीला समजाविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या वर्तनात कोणताही फरक पडला नाही. उलट टीनपत्रे रस्त्यात टाकील अशी वादीस धमकी दिली.

<u>०७</u> त्यामुळे प्रतिवादी केव्हाही वादीचे पश्चिमेकडील घरासमोर टिनपत्रे टाकुन वादीचा पश्चिमेकडील रस्ता अडवु शकतो. अशी भिती वादीच्या मनात निर्माण झाल्याने तो दि.२३.०६.२०२२ रोजी पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी गेला असता त्यांनी सदर वाद हा दिवाणी स्वरुपाचा सांगून दिवाणी न्यायालयात जाण्याचा सल्ला दिल्याने सदर दावा दाखल केल्याचे म्हटले. वादीच्या जागेच्या पश्चिमेकडून रस्त्यात खुले जागेवर प्रतिवादीचा कोणताही हक्क अधिकार नसतांना वादीच्या पश्चिमेकडील दाराच्या समोर टिनपत्रे टाकले तर वादीचा वापरातील रस्ता बंद होईल. परंतु वादीच्या हक्कात कायमचा मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे

कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नसल्याचे सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**<u>०८</u>** याउलट मूळ प्रतिवादीने नि.क्र.१४ खाली लेखी जबाब आणि प्रतिदावा दाखल करुन वादीचे सर्व कथन नाकारले. सोबतच त्याने नि.क्र.१५ खाली वादीविरुध्द सुध्दा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीने त्याच्या जागेमध्ये पूर्ण बांधकाम केलेले आहे. वादीच्या जागेच्या पश्चिम दिशेला वादीची कोणतीही जागा शिल्लक नाही. तसेच पश्चिम दिशेला कोणता रस्ताही नाही. पश्चिम बाजूने रस्ता असल्याबाबतचे कोणतेही दस्तऐवज वादीने दाखल केलेले नाही. त्यामुळे वादीचा सदर अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**<u>०९</u>** प्रतिवादीने सोबतच प्रतिदावा दाखल करुन कथन केले की, ०८.२३ मीटर X ३५.०६ मिटर म्हणजेच २८८.५४ चौ.मीटर अशी जागा दगड सिमेंट आणि चुना याने बांधली असून तिच्या पूर्वेला – ज्ञानबा वाढे, वादी, सुनिल देशमुख, सुमनबाई देशमुख यांच्या नावे परंतु ताबा रमेश देशमुख यांचा, पश्चिमेला – निळकंठराव बाजीराव सरनाईक, उत्तरेला – रस्ता आणि दक्षिणेला – रस्ता असून सदर जागा ही देउळगाव बंडा, ता.रिसोड जि.वाशिम येथील आहे. (सदर जागेला यानंतर प्रतिदाव्यातील मिळकत असे संबोधण्यात येते.)

**<u>१०</u>** प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिदाव्यातील मिळकत ही त्याची वडीलोपार्जित मिळकत आहे. त्याने वंशावळ प्रतिदाव्यात नमूद केली आहे. त्यानुसार तो प्रतिदाव्यातील मिळकतीचा मालक व ताबेदार आहे. प्रतिवादीच्या वडीलांनी सदर मिळकतीच्या काही भागावर दगड सिमेंट आणि चुना याने बांधकाम केले असून काही भाग खुला आहे. तसेच सदर मिळकतीच्या पुर्वेला एक विटा आणि सिमेंटची भिंत बांधलेली असून ती वादीच्या घराला लागून आहे. प्रतिदाव्यातील मिळकत ही वादीच्या घराच्या पश्चिमेला आहे.

**<u>११</u>** दोन वर्षापूर्वी वादीने त्याच्या घराचे बांधकाम केले. त्यावेळी घराच्या पश्चिम बाजूला कोणताही दरवाजा नव्हता. परंतु मे– २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात त्याने पश्चिम बाजूला एक दरवाजा उघडून संडासचे पाईप पश्चिम बाजूला लावून त्याचे पाणी प्रतिदाव्यातील मिळकतीत सोडलेले आहे. प्रतिवादीच्या माघारी वादीने सदर बांधकाम केलेले आहे. त्यामुळे वाद उत्पन्न झाला होता. वादीने त्याचे घराचे बांधकाम करतांना पश्चिम बाजूला कोणतीही जागा सोडली नव्हती. त्यामुळे पश्चिम बाजूला वादीची कोणतीही खुली जागा नाही. वादीला पश्चिम बाजूने दरवाजे आणि पाईप काढण्याचा आणि त्याचे पाणी प्रतिवादीच्या जागेत सोडण्याचा

कोणताही अधिकार नाही. तसेच वादीने प्रतिवादीची बांधलेली भिंत सुध्दा मोडली आहे. वादीला त्याच्या घराच्या पूर्व बाजूने मोकळा रस्ता आहे. परंतु पश्चिम बाजूने कोणताही रस्ता नाही. त्यामुळे वादी हा पूर्व बाजूने त्याचे संडासचे पाईप आणि पाणी सोडू शकतो.

**१२** प्रतिवादीने वादीला त्याचे पाईप काढण्याची विनंती केली असता वादीने आश्वासन देउनही पश्चिम भिंतीकडील पाईप काढले नाही. उलट पश्चिम बाजून अधिक बांधकाम करण्याची धमकी देउन पावसाचे पाणी सुध्दा सोडण्याची व प्रतिवादीला जागेतून बेदखल करण्याची धमकी दिली. वादी हा भांडखोर स्वभावाचा असून त्याच्याकडे माणसाचा जोडजमाव असल्याने प्रतिवादीला त्याच्याशी भांडता आले नाही. त्यामुळे प्रतिवादीला सदर प्रतिदावा प्रतिबंधात्मक मनाई हुकुमाकरिता दाखल करावा लागत असल्याचे म्हटले. त्यामुळे वादीचा दावा आणि अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

**१३** याउलट मुळ वादीने प्रतिवादीच्या प्रतिदाव्याला नि.क्र. २२ नुसार लेखी जवाब दाखल करुन प्रतिवादीचा प्रतिदावा खोटा असल्याचे म्हटले. उलट जवाब दाव्यात वादपत्रातील तथ्यांप्रमाणे कथन करुन प्रतिवादीचा प्रतिदावा हा खोटा असल्याने व वादींना त्रास देण्यासाठी दाखल केल्याने खर्चासह खारिज करण्याची विनंती केली.

**१४** वादीने दस्तऐवज यादी नि.क्र.०४ खाली दि.२४.०४.२०२२ रोजीची घराची करवसूली पावती, दि.०५.०५.२०२२ रोजीचा नमूना ८–अ ची प्रत दाखल करुन नानासाहेब गोपालराव देशमुख, नारायण किसनराव देशमुख आणि पंजाब किसन वाढे यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. याउलट, प्रतिवादीने दस्तऐवज यादी नि.क्र.१९ खाली त्याच्या घराची करपावती व घराचा नमुना आठ – अ तसेच निळकंठराव बाजीराव सरनाईक, विश्वनाथराव गणपतराव सरनाईक, निलेश दत्तराव सरनाईक, झनकराव रामराव सरनाईक यांचे प्रतिज्ञापत्रे आणि नमुना आठ – अ च्या प्रती दाखल केल्या. तसेच संतोष नारायणराव बांगर यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन जयसिंगराव सरनाईक यांच्या घराच्या नमूना आठ – अ ची प्रत दाखल करुन वाद जागेवरील वस्तुस्थिती दर्शवणारे ०६ छायाचित्रे दाखल केली.

**१५** दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ वादींनी कायमचा मनाईहुकूम मिळणेबाबत दिनांक १६.०७.२०२२ रोजी दाखल केला. त्याच दिवशी तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज सुध्दा दाखल केला होता. त्यानंतर मुळ प्रतिवादीला समन्सची तामिली होऊन तो दिनांक २१.०८.२०२२ रोजी नि.क्र. ०९ नुसार

हजर होऊन नि.क्र. १० नुसार लेखीजवाब दाखल करण्यास वेळ मागितला. त्यानंतर दिनांक ०३.११.२०२२ रोजी मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीने नि.क्र. १४ नुसार लेखीजवाब व प्रतिदावा दाखल केला. त्याचदिवशी नि.क्र. १५ नुसार तात्पुरता मनाईहुकुमाचा अर्ज सुध्दा दाखल केला. मुळ वादींना प्रतिदाव्यास व तात्पुरता मनाईहुकुमाच्या अर्जास म्हणणे दाखल करण्यास नि.क्र. १६ व १७ नुसार वेळ देण्यात आला होता. परंतु मुळवादींनी प्रतिदाव्यास म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक ०३.०२.२०२३ रोजी नि.क्र. ०१ वर विनाजवाब आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर मुळवादींनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी नि.क्र. २० नुसार विनाजवाब आदेश रद्य करुन प्रतिदाव्याला त्यांचा लेखी जवाब नि.क्र. २२ वर दाखल केला आहे.

**१६** वादीने मुळ दाव्यातील वाद मिळकतीवर बांधकाम केल्याचे दिसुन येते. मुळ वादीच्या कथनानुसार त्याच्या जागेच्या पश्चिम बाजुला सरकारी रस्ता आहे. त्यामुळे त्याने पश्चिमबाजुला दरवाजा काढला असुन तो त्याचा वापर करत आहे. उलट प्रतिवादीने कथन केले की, दोन वर्षापूर्वी वादीने त्याच्या घराचे बांधकाम केले. त्यावेळी घराच्या पश्चिम बाजूला कोणताही दरवाजा नव्हता. परंतु मे– २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात त्याने पश्चिम बाजूला एक दरवाजा उघडून संडासचे पाईप पश्चिम बाजूला लावून त्याचे पाणी प्रतिदाव्यातील मिळकतीत सोडले. प्रतिवादीच्या माघारी वादीने सदर बांधकाम केल्याने वाद उत्पन्न झाला होता. वादीने त्याचे घराचे बांधकाम करतांना पश्चिम बाजूला कोणतीही जागा सोडली नसल्याने पश्चिम बाजूला वादीची खुली जागा नाही. वादीला पश्चिम बाजूने दरवाजे आणि पाईप काढण्याचा आणि त्याचे पाणी प्रतिवादीच्या जागेत सोडण्याचा कोणताही अधिकार नसुन वादीने प्रतिवादीची बांधलेली भिंत मोडली आहे. पश्चिम बाजूने कोणताही रस्ता नाही. वादीच्या घराच्या पूर्व बाजूने मोकळा रस्ता असुन तो पूर्व बाजूने संडासचे पाईप व पाणी सोडू शकतो.

**१७** दोन्ही पक्षांचे कथन दाखल दस्तऐवज बघता दोन्ही पक्षकार हे एकमेकांच्या परस्पर विरोधी विधाने करित आहेत. परंतु अभिलेखावर दाखल दस्त वादीच्या वाद मिळकतीच्या पश्चिम बाजुला सरकारी किंवा कोणताही इतर रस्ता दर्शवीत नाही. तसेच वादीने त्याच्या घराचे बांधकाम झाल्यानंतर उशिराने दरवाजाने संडासचे पाईप पश्चिम बाजुकडून काढलेले आहे. वादीच्या वाद मिळकतीच्या पश्चिम बाजुला रस्ता किंवा खुली जागा असल्याचे कोणतेही दस्तऐवज वादीने दाखल केलेले नसल्याने सदर सरकारी रस्त्याच्या लगतच्या खुल्या जागेवर लोखंडी टिनपत्रे टाकुन प्रतिवादीने रस्त्यावर ताबा करण्याचा प्रयत्न करित असल्याचे वादीचे प्रथमदर्शनी कथन सिध्द होत नाही.

**१८** तसेच प्रतिवादीने दाखल केलेल्या छायाचित्रांमध्ये सुध्दा कोणताही रस्ता दिसुन येत नाही. तसेच दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या समर्थनार्थ काही शपथपत्रे दाखल केली आहेत. परंतु सदर शपथपत्रामध्ये केवळ तोंडी कथन आलेले आहे. रस्ता किंवा वादीची जागा वाद मिळकतीच्या पश्चिम बाजुने असल्याबाबत कोणतेही समर्पक दस्तऐवज अभिलेखावर नाही. उलट वादीने कथन केले की त्यांच्यातील वाद गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिं जसे गावातील सरपंच, पोलिस पाटील तथा इतर प्रतिष्ठीत लोकांकडे जाउन प्रतिवादीला समजाविण्याचा प्रयत्न केला, परंतु असे असतांना ही ग्रामपंचायत किंवा इतर कार्यालयाकडे तक्रार केल्याचे व त्यांनी प्रतिवादी विरोधात कार्यवाही केल्याचे अभिलेखावर आले नाही. त्यामुळे वादीच्या वाद मिळकतीच्या पश्चिमेला सरकारी रस्ता असल्याचे व त्याचा वापर वादी करीत असल्याचे सिध्द होत नाही.

**१९** तसेच प्रतिवादीने सुध्दा जरी प्रतिदाव्यातील मिळकत त्याच्या मालकीची असल्याचे कथन केले असले तरी वादीच्या घराची पश्चिम बाजुची जागा खुली आहे. सदर खुल्याजागेपर्यत प्रतिवादीची मालकी आहे, ही बाब सुध्दा स्पष्ट होत नाही. जरी नकाशात नमुद केलेली संपुर्ण जागा प्रतिवादीच्या मालकीच्या असल्यााचे प्रतिवादीचे कथन असलेतरी प्रतिवादीने दाखल केलेल्या वेगवेगळया नमुना ८–अ मध्ये प्रतिवादीच्या बांधकामानंतर चतुःर्सिमेमध्ये खुली जागा दर्शविलेली आहे. तर प्रतिवादीने दाखल केलेल्या नकाशानुसार दक्षिण बाजुला खुली जागा नसुन रस्ता आहे. त्यामुळे सुध्दा प्रतिदाव्यातील वाद मिळकतीवर दक्षिणेकडिल रस्त्यापर्यत प्रतिवादीचा ताबा आहे किंवा नाही, याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे प्रतिवादीची ताब्यात अडथळा न करण्याची प्रार्थना सुध्दा मान्य करण्याजोगी दिसून येत नाही.

**२०** वरील सर्व विवेचनावरुन अभिलेखावर दाखल केलेली दस्तऐवज हे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द करित नाहीत. दाखल करण्यात आलेले दस्तऐवज आणि वरील विवेचनावरुन पुराव्याचा समतोल सुध्दा त्या मर्यादिपुरता वादीच्या बाजुने दिसुन येत नाही. त्यामुळे वादींच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल, असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे वादी तात्पुरता मनाईहुकूम मिळण्यास या स्थितीला पात्र नसल्याचे दिसून येतात. तसेच या स्थितीला हे न्यायालय केवळ दोन्ही पक्षांच्या वकीलांनी केलेले कथन व त्यांनी दाखल केलेले दस्तऐवज यांच्या केवळ प्रारंभिक निरीक्षणावरुन सदर निर्णय घेत आहे. वस्तुस्थिती ही दोन्ही पक्षांची पुरावे बघुन गुणदोषाअंती न्यायनिर्णयावेळी स्पष्ट होईल. त्यामुळे आजरोजी उपलब्ध दस्तऐवजावरुन त्यामुळे मुद्दा क्र. ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून

मुददा क्र. ०२ चे उत्तर सुध्दा सिध्द झाले नाही असे नोंदविले. परंतु वादींचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने मुद्दा क्र. ०३ चे उत्तर प्रतिवादीच्या हक्कात नोंदवून मुद्दा क्र. ०४ चे उत्तराकरिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–आदेश –**

वादींचा अर्ज या स्थितीला नामंजूर करण्यात येतो.

स्वा/-

( यो.द. कोईनकर)

दिनांकः ३०.०८.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H.A.Uchade (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 30.08.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 30.08.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 30.08.2023 |